# तुझा विचार

खूप पूर्वी ऐकलेल्या,
पण मनात घोळत राहिलेल्या
एखाद्या मधाळ धूनेसारखा
तुझा विचार..
अधून-मधून डोके वर काढत रहातो...
सर्व जंजाळाशी लढतानाही,
माझ्या ओठांवर एक अलवार हसू..
येत-जाता रेखाटत रहातो.
विसरल्या सारखा वाटला तरी..
प्रत्येक आठवणीत ताजा होतो,
कुठल्या जन्मीचा वेगळाच बंध,
विणत परत घट्ट होतो !
मधेच पडत जातात त्याच्यावर,
काळाचे धुकट - पडदे...
आणि गर्दीत हरवत जातो -
तुझा विचार निमूट ...
पुढच्या आठवणीची वाट पहातो !!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**